RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ८, अंक १२] मंगळवार, फेब्रुवारी १५, २०२२/माघ २६, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक २०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**जिल्हाधिकारी, पालघर यांजकडून**

मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्प

**अधिसूचना**

**मौजे नागले, मौजे गोखिवरे, मौजे ससुनवघर, मौजे भाटपाडा व मौजे चंदनसार, ता. वसईकरिता भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम २५ मधील परिच्छेद २ अन्वये कलम १९ नुसार प्रसिद्ध केलेल्या घोषणेस मुदतवाढ**

क्रमांक/पुनर्वसन/NHSRCL/टे-२/कावि-१६३/२०२२.—ज्याअर्थी, मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पाकरिता भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यामधील २० गावांकरिता घोषणा जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून प्रसिद्ध करणेंत आली आहे ;

ज्याअर्थी, उक्त नमूद अधिसूचनेमधील नमूद सर्व्हे नंबरकरिता कलम २१ अन्वये संबंधितांना नोटिसा बजाविणेत आल्या. तथापि, संपादित होत असलेल्या मौजे नागले, गोखिवरे, ससुनवघर, भाटपाडा व चंदनसार ह्या गावातील सर्व्हे नंबरमधील बहुतांश सर्व्हे नंबर हे गोळा प्लॉट्स असून, पोट हिश्याची मोजणी झालेली नाही. तसेच काही सर्व्हे नंबरमधील जमिनीवर बांधकामे आहेत. त्यामुळे संपादनामध्ये अडचणी येत होत्या. सबब अशा सर्व्हे नंबरची पुर्णमोजणी करून क्षेत्र निश्चित होणे आवश्यक होते. त्यामुळे कलम २३ अन्वये संपादनाबाबतचा निवाडा मुदतीत घोषित करणे शक्य झालेले नसल्यामुळे, सदरच्या अधिसूचनांपैकी मौजे नागले, गोखिवरे, ससुनवघर, भाटपाडा व चंदनसार ह्या गावांच्या अधिसूचनेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, भूमी संपादन अधिनियम, २०१३ कलम २५ मधील परिच्छेद २ नुसार " समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल." अशी तरतूद केली आहे ;

ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम ३ (इ) व **महाराष्ट्र शासन राजपत्र** दिनांक २७ ऑगस्ट, २०१४ मधील २ (ड) नुसार " समुचित शासन याचा अर्थ, महाराष्ट्र राज्याच्या भूप्रदेशात स्थित असलेल्या जमिनीच्या संपादनासंबंधात राज्य शासन असा आहे आणि त्यामध्ये, त्यामधील अधिसूचित क्षेत्राकरिता राज्य शासनाने नियुक्त केलेला संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, यांचा समावेश आहे" अशी तरतूद आहे.

त्याअर्थी, मी, डॉ. माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी पालघर, मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून कलम १९ अन्वये प्रसिद्ध केलेल्या घोषणेस खालील नमूद तक्यात दर्शविल्याप्रमाणे ६ महिन्यांच्या कालावधीकरिता मुदतवाढ देत आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव व तालुका | अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याचा क्रमांक व दिनांक | भूमी संपादन अधिनियम, २०१३ कलम २५ मधील परिच्छेद २ नुसार मुदतवाढ दिलेला कालावधी |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | नागले, ससुनवघर, गोखिवरे, भाटपाडा व चंदनसार, ता. वसई. | महाराष्ट्र शासन **राजपत्र** असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी दिनांक १६ फेब्रुवारी २०२१. | १६ ऑगस्ट २०२२ पर्यंत |

पालघर,
दिनांक १५ फेब्रुवारी २०२२.

**डॉ. माणिक गुरसळ,**
जिल्हाधिकारी, पालघर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.